Jr. No. 43053
UGC Approved Referred Journal

# Printing Area

Special Issue
March-2018
International Multilingual Research Journal
ISSN 2394-5303



## Social Reformer :
## Dr.Babasaheb Ambedkar

Prof. Dinesh Jaronde

Scanned by TapScanner

26) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता
प्रा. डॉ. रणधीर साठे, चंद्रपूर || 94

27) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शेती
प्रा. राणी जगन्नाथराव जाधव, गढी, ता.गेवराई, जि. बीड || 97

28) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विकाससंबधी आर्थिक विचार
डॉ. रंजना सुखदेव लांजेवार, सावरगांव ता. नरखेड, || 102

29) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व समाज : एक आढावा
सिध्दार्थ कुंडलीक इंगोले, औरंगाबाद || 106

30) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान
प्रा. एस.एस. तायडे, मुर्तिजापूर, || 108

31) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण
प्रा.संदिप कोरडे, अर्धापूर, ता.अर्धापूर जि.नांदेड. || 110

32) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेमौलिक कार्य व राष्ट्र उभारणीत योगदान
प्रा. संजय दौ. बेले, चंद्रपूर || 113

33) डॉ. बाबासाहेब आंबेकरांचे कृषी क्षेत्रातील योगदान
प्रा.डॉ.संतोष उध्दवराव धामने, वाशिम. || 118

34) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्म
प्रा.सारिका विष्णु केदार, जि. परभणी. || 121

35) डॉ. बाबासाहेब आंबेडकर और हिंदू कोडबिल
प्रा. डॉ. मालती डी. शिंदे (चव्हाण), आ. बाळापूर, || 125

36) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदु कोड बिल
प्रा. शिवचरण नामदेव धांडे, एकोडीता. साकोली जि. भंडारा || 127

37) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व समाज
प्रा. श्रावण बळीराम कापगते, साकोली जि. भंडारा || 131

38) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
डॉ. श्रीहरी चव्हाण, राणीसावरगाव, ता. गंगाखेड, जि. परभणी || 136

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned by TapScanner

26) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता
प्रा. डॉ. रणधीर साठे, चंद्रपूर || 94

27) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शेती
प्रा. राणी जगन्नाथराव जाधव, गढी, ता.गेवराई, जि. बीड || 97

28) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विकासासंबधी आर्थिक विचार
डॉ. रंजना सुखदेव लांजेवार, सावरगांव ता. नरखेड, || 102

29) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व समाज : एक आढावा
सिध्दार्थ कुंडलीक इंगोले, औरंगाबाद || 106

30) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान
प्रा. एस.एस. तायडे, मुर्तिजापूर, || 108

31) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण
प्रा.संदिप कोरडे, अर्धापूर, ता.अर्धापूर जि.नांदेड. || 110

32) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेमौलिक कार्य व राष्ट्र उभारणीत योगदान
प्रा. संजय दौ. बेले, चंद्रपूर || 113

33) डॉ. बाबासाहेब आंबेकरांचे कृषी क्षेत्रातील योगदान
प्रा.डॉ.संतोष उध्दवराव धामने, वाशिम. || 118

34) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्म
प्रा.सारिका विष्णु केदार, जि. परभणी. || 121

35) डॉ. बाबासाहेब आंबेडकर और हिंदू कोर्डबिल
प्रा. डॉ. मालती डी. शिंदे (चव्हाण), आ. बाळापूर, || 125

36) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदु कोड बिल
प्रा. शिवचरण नामदेव धांडे, एकोडीता. साकोली जि. भंडारा || 127

37) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व समाज
प्रा. श्रावण बळीराम कापगते, साकोली जि. भंडारा || 131

38) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार
डॉ. श्रीहरी चव्हाण, राणीसावरगाव, ता. गंगाखेड, जि. परभणी || 136


www.vidyawarta.com/03 - http://www.printingarea.blogspot.com



Scanned by TapScanner

आयुष्यातील २५ वर्ष पत्रकारितेला दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या पत्राकरीतेच्या माध्यमातून विविध सामाजिक समस्याची दखल घेतलेली पाहावयास मिळते. देवदासीच्या समस्या, स्त्रियांच्या समस्या, शेतकरी, शेतमजुरांच्या समस्या, कामगाराच्या समस्या अशाकितीतरी सामाजिक समस्या हृदयास स्पर्श करतील अशापध्दतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्राद्वारे ब्रिटीश सरकार, हिंदू समाज यांना योग्य दिशा देण्याचे कार्य केले. वर्तमानपत्र हि समाजाला जागृत करणारी शक्ती आहे असे ते मानत असत. त्यांचे वृत्तपत्रातील कार्य आजच्या समाजाला प्रेरणा, दिशा व दृष्टी देणारे नक्कीच ठरतात.

**संदर्भ ग्रंथः—**

१. मुन वसंत (संपादक) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक (१९९०) शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई—३२

२. गायकवाड प्रदिप(संपादक) जनता (२०११) व (२०१२) समता प्रकाशन नागपूर —१७

३. किर धनंजय डॉ. बाबासाहेब आंबेडकर,(२००६) पॉप्युलर प्रकाशन मुंबई—२६

४. आवरे प्रविण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता व त्यांची वृत्तपत्रे फेब्रूवारी २०१६

५. मुताबिक सुबोध— डॉ. बाबासाहेब आंबेडकर (भारतरत्न पुरस्कार १९९०) दैनिक लोकमत (मंथन) दि. २६ ऑक्टो २०१४

६. गायकवाड प्रदिप (संपादक) प्रबुध्द भारत १९५६, (२०१०) समता प्रकाशन नागपूर —१७

**27**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शेती

**प्रा. राणी जगन्नाथराव जाधव**
गृहशास्त्र विभागप्रमुख
कला व विज्ञान महाविदयालय शिवाजीनगर
गढी, ता.गेवराई, जि. बीड

==============***********===============

**प्रस्तावना**

'While other countries like the U.S.A starting as agricultural are progressively becoming industrial. India has been gradually undrgiong the woeful process of de-urbanization and swelling the volume of her rural population beyond all needs. The earlier we stem this ominous tide the better for notwithstanding what interested person might say no truer and more wholesome words of caution were ever uttered regarding our national economy than those by Sir Henry Cotton when he said' There is dangr of too much agriculture in Indian'1

Dr. B.R Ambedkar

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपरोक्त उध्दरणात भारतीय शेतीसंबंधी जी प्रतिकिया व्यक्त केली. त्यावरून त्यांची शेतीच्या प्रश्नाकडे बघण्याची विवक्षित दृष्टी आपल्या लक्षात येते. शेतीवर जगणारा देश म्हणजे भारत अशी आपली वास्तव स्थिती आहे. शेती असणारे शेतकरी,शेती नसणारे कारागीर, शेत नसणारे शेतमजूर मागत्यासह सारे भारतीय जनसमूह शेतीवरच जगतात. छोटी मोठी शहरे जो व्यवहार करतात. तोही शेतीमालाच्याव्यवहारावरच करतात असे असले तरी शेती आणि शेतकरी शतकानुशतका पासून विवंचनेत जगत आला आहे शेती शेतकरी आणि त्यावर अवलंबून असणारे सारे जनसमूह विचारात घेऊनच भारतीय समाजाचा



Scanned by TapScanner

आयुष्यातील २५ वर्ष पत्रकारितेला दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या पत्राकरीतेच्या माध्यमातून विविध सामाजिक समस्याची दखल घेतलेली पाहावयास मिळते. देवदासीच्या समस्या, स्त्रियांच्या समस्या, शेतकरी, शेतमजुरांच्या समस्या, कामगाराच्या समस्या अशाकितीतरी सामाजिक समस्या हृदयास स्पर्श करतील अशापध्दतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्राद्वारे ब्रिटीश सरकार, हिंदू समाज यांना योग्य दिशा देण्याचे कार्य केले. वर्तमानपत्र हि समाजाला जागृत करणारी शक्ती आहे असे ते मानत असत. त्यांचे वृत्तपत्रातील कार्य आजच्या समाजाला प्रेरणा, दिशा व दृष्टी देणारे नक्कीच ठरतात.

**संदर्भ ग्रंथ:—**


१. मुन वसंत (संपादक) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक (१९९०) शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई—३२

२. गायकवाड प्रदिप(संपादक) जनता (२०११) व (२०१२) समता प्रकाशन नागपूर —१७

३. किर धनंजय डॉ. बाबासाहेब आंबेडकर,(२००६) पॉप्युलर प्रकाशन मुंबई—२६

४. आवरे प्रविण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता व त्यांची वृत्तपत्रे फेब्रुवारी २०१६

५. मुताबिक सुबोध— डॉ. बाबासाहेब आंबेडकर (भारतरत्न पुरस्कार १९९०) दैनिक लोकमत (मंथन) दि. २६ ऑक्टो २०१४

६. गायकवाड प्रदिप (संपादक) प्रबुध्द भारत १९५६, (२०१०) समता प्रकाशन नागपूर —१७


**27**

# डॉ. बाबासााहेब आंबेडकर व शेती


**प्रा. राणी जगन्नाथराव जाधव**

गृहशास्त्र विभागप्रमुख

कला व विज्ञान महाविदयालय शिवाजीनगर गढी, ता.गेवराई, जि. बीड


==============***********===============

**प्रस्तावना**

'While other countries like the U.S.A starting as agricultural are progressively becoming industrial. India has been gradually undrgiong the woeful process of de-urbanization and swelling the volume of her rural population beyond all needs. The earlier we stem this ominous tide the better for notwithstanding what interested person might say no truer and more wholesome words of caution were ever uttered regarding our national economy than those by Sir Henry Cotton when he said' There is dangr of too much agriculture in Indian'1

Dr. B.R Ambedkar

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपरोक्त उध्दरणात भारतीय शेतीसंबंधी जी प्रतिकिया व्यक्त केली. त्यावरून त्यांची शेतीच्या प्रश्नाकडे बघण्याची विवक्षित दृष्टी आपल्या लक्षात येते. शेतीवर जगणारा देश म्हणजे भारत अशी आपली वास्तव स्थिती आहे. शेती असणारे शेतकरी,शेती नसणारे कारागीर, शेत नसणारे शेतमजूर मागत्यासह सारे भारतीय जनसमूह शेतीवरच जगतात. छोटी मोठी शहरे जो व्यवहार करतात. तोही शेतीमालाच्याव्यवहारावरच करतात असे असले तरी शेती आणि शेतकरी शतकानुशतका पासून विवंचनेत जगत आला आहे शेती शेतकरी आणि त्यावर अवलंबून असणारे सारे जनसमूह विचारात घेऊनच भारतीय समाजाचा



Scanned by TapScanner

विचार करणे शक्य आहे. असा विचार करणारेच महापुरूष या देशाने भाग्यविधाते ठरतात. या देशात शेती शेतकरी आणि शेतीशी संबधित समुहाचा गंभीरपणे विचार छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा जोतीराव फुले राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आणि त्यांनी उभारलेल्या चळवळीनीच केला.२

**भारतातील लहान शेतजमीनी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी लिहिलेला स्मॉल होल्डीग्ज इन इंडिया अँन्ड देअर रेमिडिज हा संशोधनपर लेख १९१८ साली जर्नल ऑफ द इंडियन इकॉनॉमिक्स सोसायटीच्या खंड १ मध्ये प्रकाशित झाला या संशोधनपर निंबधाची मांडणी डॉ आंबेडकरांनी १.शेतीचे महत्व २.भारतातील शेतजमिनीचे लहान तुकडे ३.जमिनीचे एकीकरण ४. जमिनीचे विस्तारीकरण ५.उपाय योजनांचा आढावा या पाच प्रकरणांच्या आधारे केलेली आहे. भारतीय आर्थिक जीवनात भारत हा सर्वात मोठे कृषी क्षेत्र असलेला देश दिसतो मात्र कृषी उत्पादन अत्यंत कमी दिसते वारसा हक्कामुळे वारसांना जरी न्याय मिळत असला तरी त्यामुळे जमिनीचे तुकडे होतात. त्याकारणाने भारतातील शेती अत्यंत अकार्यक्षम होत गेली जमिनीच्या तुकडीकरणाचे भयानक दुष्परिणाम होत असल्याने त्यासाठी सर्वसमावेश अशी एकीकरणाची व्यापक हाती योजना घेण्याची आवश्यकता आहे असे डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात जमिन एकीकरणाच्या अनेक पध्दती आहेत जमिनीचे एकीकरण स्वेच्छेने व कायदयाच्या सक्तीने करता येईल सक्तीने जमीन ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेबाबत प्रा. जेव्होन आणि बडोदा समिती या दोघांनीही काही प्रस्ताव मांडला होता त्याचा परामर्श घेऊन डॉ आंबेडकरांनी आपले मत मांडले, भारतीय शेती लहानतुकडे व विखुरलेल्या मालकीने ग्रस्त आहे तर आपण केवळ त्याचे एकीकरण करून चालणार नाही तर त्याचा विस्तारही केला पाहिज.

**सहकारी शेतीचा पुरस्कार**

अल्पभूधारक मदत विधेयक मुंबई विध ीमंडळात १० ऑक्टोबर १९२७ साली मांडण्यात आले यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी वहितसाठी असणा–या जमिनीचा कस कमी होत असून उत्पादकता घटली असल्याची चिंता प्रकट केली. मुंबई राज्यातील शेती क्षेत्रातील समस्यांवर त्यांनी उपाय सुचविले. उपाय सांगताना ते म्हणतात 'लहान धारणक्षेत्र आसणा–या शेतक–यांची मालकी कायम ठेवून सहकरी तत्वावर शेती करणे बंधनकारक केले पाहिजे त्यामूळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एस.आर. इंदुशी यांच्या 'सोशल इन्श्युरन्स अँण्ड इंडिया' पुस्तकाच्या पुस्तावनेत लेखकाच्या भुमिकेस पाठिंबा दिला आणि ग्रामीण भागातील जनतेच्या स्थितीत सूधारणा होण्यासाठी आणि दुष्काळात आर्थिक संकट कमी करण्यासाठी पीक विमा योजना विकसित व्हावी असे म्हटले आहे.४सहकारी शेतीच्या तरतुदीमुळे लागवडीखालील एकूण जमीन प्रमाणित आकारमानाची असेल तसेच ती एकसंधही असेल अशाप्रकारे डॉ आंबेडकरांनी शेतीविषयक आपली भूमिका विशद केली.

**सामुदायिक शेती**

'ऑल इंडिया शेडुयल्ड कास्ट फेडरेशन' च्या वतीने डॉ आबेडकर १९४६ साली घटना समितीला एक मसुदा सादर केला होता त्यामध्ये त्यांनी औदयोगीकरण आणि सामुदायिक शेतीसंबंध ी शासकीय कार्यक्रम जाहीर केला होता राज्यघटना अस्तित्वात आल्यापासुन दहा वर्षाच्या आत हा राज्य समादवाद अंमलात आणण्याची त्यांची योजना होती.

'सामुदायिक शेती' च्या योजनेनुसार मूलभूत उदयोग आणि विमा याप्रमाणे सर्व जमीन शासनाने स्वतच्या ताब्यात घ्यावी. मग ती जमीन व्यक्तीच्या मालकीची असो. कुळ म्हणून असो की त्याच्याकडे ती जमीन गहाण असो मात्र ज्यांच्याकडुन जमीन घेतली जाईल त्यांना योग्य भरपाई दिली जावी. शासनाने जमीन ताब्यात घेतल्यावर तिचे ठराविक



Scanned by TapScanner

आकराचे भाग करून ते गावातील रहिवाश्यांना करण्यासाठी दयावेत.५

**शेतसा–यासंबधी अग्रणी भुमिका:**

शेतक–याकडून वसूल केल्या जाणा–या शेतसा–यासंबंधी अर्थशास्त्रज्ञ आणि भारतीय सामाजिक चळवळीचे तत्कालीन अग्रणी म्हणून स्पष्ट भुमिका घेतली शेती ही सरकारी मालमत्ता आहे. शेतकरी हा कब्जेदार आहे. ही शासनाची भुमिका डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हती त्यामुळेच शेतीतील उत्पनाचा विचार न करताच वसुल केल्या जाणा–या शेतसास–यास त्यांनी विरोध केला शेतसारा वसूल करणे.ठराविक कालावधीनंतर शेतसारा वाढविणे म्हणजे शेंतक–यांची लुट आहे आणि शेती शेतक–यांची विकसातील अडथळा आणणारी बाब आहे असे त्याचे म्हणणे होते. १८ ऑगस्ट १९२५ ला प्रसिध्द झालेल्या लेखात त्यांनी म्हटले आहे की, शेतीच्या निव्वळ काल्पनिक उत्पन्नाच्या अंदाजावरून सरसकट शेतसारा आकरणी गैर आणि अन्याय कारक आहे. खर्च वजा जाता राहील ते उत्पन्न असा ठोकताळा घेतला तरी खर्च आणि उत्पन्न हयांचे प्रमाण सर्व सारखेच सापडणार नाही कधी समान प्रमाणात उत्पन्न घेण्यासाठी असमान प्रमाणात खर्च करावा लागतो. असा जेव्हा प्रसंग येईल तेथे सर्वसाधारण एकच खर्चाचा आकडा ध रून उत्पन्न आकारणे गैर होईल.६

**शेतीला औदयोगिकरणाची जोड**

डॉ. आंबेडकरांनी शेतीला औदयोगिक दर्जा दिला. त्यामुळे अदयोगाला ज्या सवलती शासन देते तशाच सवलती शेती उदयोगाला मिळायला पाहिजे असे त्यांचे प्रतिपादन होते. शेती समस्येवर औदयोगिकरण हाच एक उपाय आहे असे डॉ. आंबेडकरांचे विचारप्रमेय होते. डॉ. रावसाहेब कसबे यांसदर्भात लिहितात ‘भारताच्या शेतीसमस्येवरील उपायासंबंधी आंबेडकरांची भुमिका ही सतत विकसित होत गेली. शेतीसमस्येबाबतचा त्यांचा सुरूवातीचा दृष्टीकोन हा फार मोठया प्रमाणात अर्थशास्त्राज्ञाच्या भुमिकेतून होता. त्यामुळे निर्माण होणारा वाजवीपेक्षा अधिक रोजगार भांडवल यत्र सामुग्रीचा तुटवडा त्याचा परिणाम म्हणून शेतीक्षेत्रातील कमी उत्पादकता व वाढवा ;नतचसनेद्धनिर्माण होण्याचा अतिमंद वेग आणि त्यामुळे आर्थिक प्रगती साध्य करण्याची प्रक्रिया गतिमान करण्यामध्ये निर्माण होण्या–या अडचणी या गोष्टींवर होता या संदर्भात त्यांनी औदयोगिकरण वेगाने घडवून आणून शेतीक्षेत्रातील अतिरिक्त मनुष्यबळ औदयोगिक क्षेत्रात सामाववून घेण्याचा तोडगा सुचविला.७

**शेतीसंबंधी पूरक भूमिका**

शेतीच्या विकासासाठी सिंचनव्यवस्था आणि विजेची अत्यंत आवश्यकता आहे ही व्यवस्था शासनाने शेतक–यांना उपलब्ध करून देणे त्यांचे कर्तव्य ठरावे त्यादृष्टीने डॉ आंबेडकरांनी ३ जानेवारी १९४५ रोजी यासंबंधी एक योजना सुचविली होती शासनाच्या अंतर्गत सेन्ट्रल टेक्नीकल पॉवर बोर्ड, आणि सेन्ट्रल वॉटर वेज इरिगेशन अॅन्ड नॅव्हीगेशन कमिशन या संघटनाच्या अंतर्गत नदया जोडो कार्यक्रम कार्यान्वीत करण्याचा आणि पुरामुळे जे देशाचे नुकसान होते त्यातून सुटका करण्यासाठी देशातील प्रमुख नदयांना जोडण्याचा प्रकल्प डॉ. आंबेडकरांनी जाहीर केला होता त्यामुळे पुराचे पाणी वाया जाणार नाही कोणतेही नुकसान होणार नाही आणि त्या पाण्याचा कृषिसिंचनासाठी उपयोग करता येईल आणि त्या पासून वीजनिर्मती करात येईल ही योजना करताना बंगाल सचिवालयात भाषण ;४.१.४५द्ध करताना डॉ आंबेडकर म्हणतात.

‘The tow organization has been established to advice the provinces as to how there water resources could best be utilized and how a project could be made to serve the purpose othere than irrigation. Domodarriver is the forest project along that time. It would be a multipurpose project. It will have the object of not only preventhing floods in the do modar but would also have the object of irrigation navigation and production of electricity’8

दामोदर नदीची समस्या जशी बंगालमध्ये होती तशीच समस्या संपूर्ण भारतात वेगवेगळया ठिकाणी आहे. त्यासाठी डॉ. आंबेडकरानी देशातील प्रमुख नदयांना एकमेकांना जोडण्याचा प्रकल्प जाहीर केला होता त्यापासून सिंचन वीजनिर्मिती करावी अशीही सुचना दिली होती. हा कार्यक्रम स्वातंत्र्यनंतर ५०—६० वर्षानंतरही पूर्ण झालेला नाही याचा विपरीत परिणाम आज शेती व शेतक—यांवर होत असलेला आज आपण पाहत आहोत.

**खोती पध्दतीला एकदम मूठमाती दया**

चिपळूण येथे दि.१४ एप्रिल १९२९ रोजी शेतकरी परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अध्यक्ष म्हणून बोलताना डॉ आंबेडकर म्हणाले की, 'मला असे वाटते की माझा जन्म सर्वसाधारण जनतेची जबाबदारी घेण्यासाठी असावा. मी देखील मजूरवर्गापैकी एक असून इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या चाळीत राहतो इतर बॅरिस्टरप्रमाणे मलादेखील बंगल्यातून राहता आले असते पण माझा शेतकरी व अस्पृश्य बंधू करिता मला चाळीत राहूनच काम केले पाहिजे याबद्दल मला केंव्हाही वाईट वाटत नाही.

ते पुढे म्हणतात, सारसार विचार करता खोतीची पध्दत मुळासकट सदोष आहे. सरकार विचार करता खोतीची सरकार कधीही लहानसहान ओरडीला भीक घालत नाही तुम्ही तुर्ताची चळवळ अत्यंत धिटाईने चालू ठेवली पाहिजे. आपल्यावरील अन्यायाची ओरड सारखी करीत राहून उलटपक्षाशी लढत राहिले तरच चारपाच वर्षात स्वराज्याला पोषक असे हक्क मिळणार आहेत. खोताना व खोतांच्या जातभाईना मते देऊन कौन्सिलात पाठवू नका. समाजाचे जीवन परस्वाधीन असल्यामुळे एकमेकांवर अवलबुंन राहण्याशिवा गंत्यतर नाही. कुणबी लोकांनी स्वाभिमानाला जागून वरिष्ठ लोकांची हालकीसलकी कामे करून स्वत:चा सामाजिक दर्जा मुळीच कमी करून घेऊ नये आणि अशा एकोप्याने संघटनेच्या चळवळीने आपल्या गा—हाण्याची दाद कौन्सिलपर्यंत जाऊन लावून घेता येईल. असल्या नेटाच्या प्रयत्नाचा परिणाम खात्रीने यशस्वी होईल याची मला खात्री वाटते.९

**चरीचा ऐतिहासिक प्रदीर्घ शेतकरी संप व खोती पध्दती नष्ट करण्याचे विधेयक**

सन १९०५ ते १९३१ या कालावधीत डॉ. आबेडकर ना.ना पाटील भाई चित्रे सी.के बोले, टिपणीस, परूळेकर आदीच्या नेतृत्वाखाली अनेक शेतकरी सभा, परिषदा झाल्या. त्यानंतर २७ ऑक्टोबर १९३३ रोजी जगातील एकमेव ठरलेल्या प्रदीर्घ शेतकरी संपाला प्रारंभ झाला या संपाचे नेतृत्व नारायण नागू पाटील यांनी केले खोतीविरूध्दच्या या संग्रामात चरी ;ता. अलीबागद्धकोपरपाडा,रायंदे,कोलटेंभी,कोपर या गावासह १४ गावांचे लोक सहभागी झाले. १९३३ ते १९३९ अशी सात वर्ष हा संप चालला. सावकाराच्या जमीनी कोणीही पिकवायच्या नाही असा निर्णय घेऊन संप चालला. या संपाच्या काळात चरी येथे दि.१६ डिसेंबर १९३४ रोजी शेतकरी परिषद भाई अनंतराव चित्रे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुख्य मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावली. या संपामध्ये सर्व बहुजन लोक जातीभेद विसरून एकत्रित सहभागी झाले या अंदोलनाच्या परिणामातून १७ संप्टेबर १९३७ रोजी डॉ. आबेडकरांनी खोती पध्दती नष्ट करण्याचे विधेयक मुंबई विधीमंडळात मांडले.१०

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खोती पध्दती बंद करण्यासाठी व शेतक—यांच्या विविध समस्या सोडविण्यसाठी त्यांच्यामध्ये जागृती करून अविरत प्रयत्न केले.

**समारोप**

शेतक—यांच्या प्रश्नावर चिंतन करणा—या आपल्या विविध भाषणातून व वर्तमानपत्रातून विचार माडंणा—या, त्यांच्यासाठी चळवळी उभ्या करीत स्वत:ला त्यामध्ये झोकून देणा—या डॉ बाबासाहेब आंबेडकरांना या देशातील शेती,शेतक—यांचे सर्व प्रश्न संपवायचे होते त्यामुळेच त्यांना शेतीमध्ये



Scanned by TapScanner

अधिक भांडवली गुंतवणुक करणे गरजेचे वाटते आणि शेतीवरील वाढत्या लोकसंख्येचा बोजा उदयोगादी क्षेत्राकडे वळवण्याची गंभीर सुचना ते शासनाला करतात. शेतसारा, जनावरांचा चारा आणि पाण्यावरील कर यासंबंधीच्या मागण्यावरून ते ख—या अर्थाने एक कृषीतज्ञ व शेतक—यांचे द्रष्टे नेते ठरतात. परंतु या देशातील शेतकरी आणि शेतीशी संबंधीत असणारा जनसमुह व बुध्दीजीवी वर्ग त्यांना आपला नेता न मानता विशिष्ट वर्गाचा नेता मानतात. त्यामुळे डॉ. आंबेडकर अमूल्य विचार त्यांनी शेतकरी कष्टकरी बहुजन लोकांसाठी केलेल्या विवध चळवळी त्यानी समजून घेतल्या नाहीत. आज जगात सर्वत्र या कृषीतज्ञाला जगातील एकमेव सर्वोत्कृष्ट विदवान म्हणून मान्यता मिळाली परंतु त्याच्या जन्मभुमीत त्यांना दिलेले स्थान ही या देशाची खुप मोठी शोकांतीका म्हणावी लागेल. आज सामान्य छोटे शेतकरी,शेतीवर राबाराब राबणारे सालदार, शेतमजूर यांच्या जीवनाची वाट लागली. त्यामुळे सध्याच्या काळात शेती आणि शेतक—यांचे प्रश्न आधिक वाढले आहेत यापुढे तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती व शेतक—यांच्या समस्या सोडविण्यासाठी सांगितलेल्या विविध उपाययोजना अंमलात आणल्या तर शेतक—यांच्या आत्महत्या थांबविता येतील व सध्याच्या भीषण दुष्काळाची परिस्थितीवर मात करता येईल. ख—या अर्थाने कष्टकरी जनतेचे दु:ख द्रारिद्रय नाहीसे होईल. त्यांच्या समस्या सुटतील व डॉ. आंबेडकर अभिप्रत असणारे शेतकरी—कामकरी लोकांचे सरकार स्थापन व्हायला वेळ लागणार नाही.

**संदर्भसुची**


१ Dr. Babasaheb Ambedkar writings and speeches, vol I , Govt of Maharastra, p.479

२ डॉ. प्रल्हाद लुलेकर —दलितेतरंसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर :अनंत पैलुंचा सामाजिक योध्दा, सायन पब्लिकेशन पुणे २०१५,पृ.क्र २७

३ डॉ बाबसाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार, खंड ७४ (कृषी) संपादक डॉ धनराज डहाट, संकेत प्रकाशन,नागपूर व्दितीय आवृत्ती,२०११ पृ.क्र ६ ते ८

४ डॉ. प्रल्हाद लुलेकर दलितेतरांसाठी डॉ बाबांसाहेब आंबेडकर अनंत पैलुंचा सामाजिक योध्दा,सायन पब्लिकेशन पुणे,२०१५ पृ.क्र ३७

५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार खंड ७(कृषी) संपादक डॉ धनराज डाइट,कसेत प्रकाशन,नागपूर व्दितीय आवृत्ती पृ.क्र १७—१९

६ डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १९ पृ.क्र.५३

७ पूर्वीक्त — खंड १९ पृ.क्र.३८९

८ Thus spoke Ambedkar : Eidited by Bhagwan Das Ambedkar Sahitya Prakashan, Banglore, Vol 3, P-42

९ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन प्रथमावृती १९९० पृ.क २७४ बहिष्कृत भारत ३ मे १९२९

१० जगातील एकमेव, शेतक—याचा प्रदीर्घ संप—संपादक श्री बळीराम जाधव सुविदय प्रकाशन पुणे




Scanned by TapScanner